# कोरोना महामारी नंतर झालेले दृश्यकलेवरील परिणाम

**श्री. संतोष बाबासो पाटील** संशोधक विद्यार्थी समाजशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:-**

'कला म्हणजे विविध घटकांची अनुभूती देणारी मांडणी' अशी कलेची एक व्याख्या केली जाते. कलेचे अनेक प्रकार आहेत. त्यातील 'दृश्यकला' हा एक प्रकार. यामध्ये चित्रकला शिल्पकला या कलांचा समावेश होतो. चित्र शिल्प कला ही आनंद देणारी दृश्यकला आहे. जागतिक स्तरावर चित्रकला आणि शिल्पकलेमध्ये खूप कलाकारांनी अवर्णनीय कार्य केले आहे.

भारताच्या कलेचा फार प्राचीन इतिहास आहे. भीमबेटका, बाघ, अजिंठा या ठिकाणची गुहाचित्रे तर वेरूळ, कोणार्क, सांची येथील शिल्पे व वास्तू या कलेची साक्ष देतात. ही चित्र शिल्पे योग्य माध्यमांमध्ये निर्माण झाली. त्यामुळे काव्यच्या ओघात ती आजही टिकून आहेत. परंतु त्यापूर्वीपासूनच्या कला मानवाच्या जीवनाला समृद्ध करून गेल्या जगातल्या सर्व जुन्या भाषांमध्मे प्राचीन अशी भाषा म्हणजे चित्रभाषा आहे. व या सर्व भाषांच्या लिपींपेक्षा जुनी लिपी म्हणजे चित्र लिपी आहे. हे आता अभ्यासाने सर्वमान्य झाले आहे.

कोणत्याही कार्माच्या पूर्तीसाठी ते कुशलतेने पूर्ण करणे माला कला म्हणतात. कला ही मानवाच्या मनाची एक अभिव्यक्ती आहे. कलेच्या अनेक समाजशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. प्लेटोच्या मते, 'कला ही सत्माची अनुकृती आहे.' अरस्तू च्या अनुसार 'कला प्रकृतीचे अनुकरण आहे. क्रायडच्या मते कला हे दमन झालेल्या वासनांचे प्रकट रूप आहे. टॉलस्टॉम म्हणतात, 'कला ही भावनांना क्रिमा, रेखा, रंग, ध्वनी आणि शब्दांच्याद्वारे अशा प्रकारे अभी व्यक्त करणे ज्मामुळे जो ती पाहतो त्याच्या मनाला भावेल.' रवींद्रनाथ टागोर यांच्या मते 'कलेमध्येच मनुष्य आपली अभिव्मक्ती करतो.' वरील विचारावंतांच्या कले विषमीच्या व्याख्या वाचल्यानंतर असे लक्षात मेते की, कला ही अभिव्यक्त होण्याचे माध्यम आहे.

कलेचे विविध निकषावर वर्गीकरण केले जाते. कलेचे वर्गीकरण दोन निकषांच्या आधारे खालील प्रमाणे केले आहे.

**१) उपयोगी कला (उपयोजित कला)**

ही कला दैनंदिन गरजांची पूर्ती करते, त्याला उपयोजित कला म्हणतात. उदाहरणार्थ आभूषण, रंगकाम, छपाई या कलेपासून आपल्याला भौतिक सुख मिळते.

**२) ललित कला –**

ललित कलांचा एकमेव उद्देश मानसिक आणि आत्मिक आनंद मिळवणे, यामध्ये सौंदर्याची अनुभूती होते. ललित कलेचे मुख्य पाच प्रकार आहेत. १) चित्रकला २) शिल्पकला (मूर्तिकार), ३) वास्तुकला ४)संगीतकला ५) काव्यकला यामधील चित्रकला या विषयाच्या संदर्भात कलेचा अभ्यास प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये संशोधकाने केलेला आहे. चित्रकला ही दृश्यकला प्रकारामध्ये येते. प्रस्तुत संशोधनाचा निबंधात दृश्यकलेवर कोरोना महामारीचा परिणाम यांचा अभ्यास केला आहे.

**उद्दिष्टे –** दृश्यकवर कोरोना महामारीचा परिणाम सकारात्मक परिणाम. कोरोना महामारी जगाच्या अगोदरचे दृश्यकला आणि नंतरचे जग माध्यमे खूप बदल झालेले दिसून येतात. हे अभ्यासण्या अगोदर आपण उपयोजित कला आणि चित्रकला. शिल्पकला यांच्मा सद्यस्थितीचा आढावा घेऊ.

व्यावहारिक उपयोगासाठी जेव्हा कला राबवली जाते. तेव्हा ती उपयोजित कला होते. आजच्या जाहिरात युगात हा नवा शब्द आहे. हस्तकलेला ती जवळची आहे. वृत्तपत्रातल्या जाहिराती. रेडिओ, टीव्हीवरील जाहिराती, गृह सजावटीसाठी फर्निचर, कपडांची फॅशन डिझाईन अशा कितीतरी क्षेत्रात उपयोजित कलेने आपला वेगळा ठसा उमटवलेला आहे. या उपयोजित कलेमधून ज्या नकळतपणे समाजाची मुल्ये व्यक्त होत असतात. जाहिराती बद्दल बोलायचे तर समाजाच्या गरजा वाढवण्याचे काम त्या करत आहेत. उपयोग वस्तूंबद्दल शहरापासून खेड्यांपर्यंत अवास्तव आकर्षण त्या निर्माण करत आहेत. आणि या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्याची कोणतीही आर्थिक क्षमता बहुसंख्य समाजामध्ये नाही. त्यामुळे विफलता, गुन्हेगारी प्रवृत्तीलाच प्रोत्साहन मिळण्याची शक्यता अधिक, साबणाच्या वडीपासून टीव्हीपर्यंत वस्तू खरेदी

१) दृश्य कला क्षेत्रावर झालेला कोरोना महामारीचा परिणाम अभ्यासणे.
२) चित्र आणि शिल्प मा दृश्य कला क्षेत्राचा इतिहासाचा अभ्यास करणे.
३) चित्रकार आणि शिल्पकार मांच्या आर्थिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
४) राष्ट्रीय स्तरावर कोरोना महामारीमुळे चित्रशिल्पकारांच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

सदर शोध निबंध लिहिताना वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. एखाद्या व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय व समस्यांचा वास्तविक तथ्याचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करण्याचे कार्म मा वर्णनात्मक संशोधन आराखड्यात केले जाते. सदर शोध निबंधासाठी या वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोत जसे शासकीय आणि अशासकीय संस्था यांचे प्रकाशित साहित्य, मासिके, आंतरराष्ट्रीम अहवाल, काही संकेतस्थळे यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**सविस्तर मांडणी :-**

दृश्यकलेवर कोरोना महामारीचा खूप परिणाम झालेला दिसून येतो. कोरोना महामारीच्या अगोदरचे दृश्यकला जग आणि नंतरचे जग यामध्ये खूप बदल झालेले दिसून येतात. हे अभ्यासण्या अगोदर आपण उपयोजित कला आणि चित्रकला. शिल्पकला यांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊ.

व्यावहारिक उपयोगासाठी जेव्हा कला राबवली जाते. तेव्हा ती उपयोजित कला होते. आजच्या जाहिरात युगात हा नवा शब्द आहे. हस्तकलेला ती जवळची आहे. वृत्तपत्रातल्या जाहिराती, रेडिओ, टीव्हीवरील जाहिराती, गृह सजावटीसाठी फर्निचर, कपड्यांची फॅशन डिझाईन अशा कितीतरी क्षेत्रात उपयोजित कलेने आपला वेगळा ठसा उमटवलेला आहे या उपयोजित कलेमधून ज्या नकळतपणे समाजाची मुल्ये व्यक्त होत असतात. जाहिराती बद्दल बोलायचे तर समाजाच्या गरजा वाढवण्याचे काम त्या करत आहेत. उपयोग्य वस्तूंबद्दल शहरापासून खेड्यांपर्यंत अवास्तव आकर्षण त्या निर्माण करत आहेत आणि या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्याची कोणतीही आर्थिक क्षमता बहुसंख्य समाजामध्ये नाही. त्यामुळे विफलता, गुनहेगारी प्रवृत्तीलाच प्रोत्साहन मिळण्याची शक्यता अधिक, साबणाच्या वडीपासून टीव्हीपर्यंत वस्तू खरेदी

करताना ग्राहकांचे आग्रक्रम काय असतात? मालाचा दर्जा यामध्ये सर्वात शेवटी असतो. सर्वप्रथम तो भावनेला बळी पडतो. त्यामुळे स्वप्न विकणाऱ्या फॅन्टसीला जाहिरातीमध्ये सर्वात पहिले स्थान असते. अशा प्रकारे उपयोजित कलेचा वापर वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असलेला आपल्याला दिसून येतो.

अजंठा वेरूळच्या लेण्यांपासून ते शिवकालीन देवळांपर्यंत मधल्या काळामध्मे चित्रकला व शिल्पकला कशी होती याचे पुरावे आज उपलब्ध नाहीत, त्यामुळे मुघल चित्रशैलीची परंपरा असलेल्या पेशवेकालीन भित्तीचित्रापासून तंजावर, राजा रविवर्मा–जे जे स्कूल ऑफ आर्ट–आधुनिक चित्रकला असा प्रवास दिसतो. एक राजा रविवर्मा याचा अपवाद सोडला तर चित्रकला ही सामान्य माणसापासून दूर राहिली. भांडवली गुंतवणूक आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे एक साधन म्हणून आज उच्चभूया चित्रकलेकडे कल वाढला आहे. प्रसार माध्यमांमुळे सामान्य माणसाच्या कानांवरून तरी अतिशय चित्रकारांची नावे गेलेली असतात. पण संगीत साहित्याच्मा तुलनेत चित्रकला सामान्य माणसाला आपली वाटत नाही एवढे खरे.

चित्रकलेमध्ये आदिवासी, भारतीय, पर्शियन, पाश्र्चात्य अशा अनेक कला प्रवाहांचा संगम झालेला दिसतो. आजचे चित्रकार पाश्र्चात्य संस्कार घेऊन पुन्हा तांत्रिक फॉर्म्सकडे, आदिम आकाराकडे, मिश्यांकडे वळत आहेत. मुख्यतः पाश्र्चात्य आणि भारतीय जाणीवांची भिन्नता आणि त्यांचा संगम यांची वैशिष्ट्ये पाहणे मनोरंजक ठरेल.

कलेकडे पाहण्याचा पाश्र्चात्म दृष्टिकोन हा Classical आहे. तर भारतीय दृष्टिकोन पौर्वात्य परंपरा मानणारा आहे. पाश्र्चात्य अभिजात शैलीचा उगम पाचव्या शतकात ग्रीसमध्मे झाला. रेनेसान्स काळात खिश्र्चन मूल्यांची जोड मिळाल्यामुळे या अभिजात कलेने नवे मानदंड निर्माण केले.

भारतीय कला ही धर्म आणि जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सौंदर्य हे स्वतंत्र मूल्य नाही. अव्दैतात विलीन होणारा तो साधनरूप सहजोद्गार आहे. व्हिनस, पामेटा अशी शिल्पे अभिजात केलेचे परमोच्च बिंदू आहेत, तर नटराज भारतीय जीवनसौंदर्याचे मूर्त रूप आहे. कलासिकल कलेला रसिकांची आवश्यकता असते. दुसऱ्यांशी

होणाऱ्या संवादातून शिल्पाची लयबद्ध आकृती, तिचा पोत अनेक कला अवयवांनी बनलेल्या घटकांचा सुसंवाद जिवंत होतो. विशिष्ट क्षण श्र्वाश्र्वत अशा दगडाच्या माध्यमांमध्मे बंदिस्त करण्याचा तो एक प्रयत्न असतो. या उलट भारतीय शिल्प हे रसिक असो अथवा नसो ते असतेच. काळाच्या पलीकडे जाणारे त्याचे आवाहन असते. व्हिनस, लाओकून ही डोळ्यांनी अनुभवण्याची शिल्पे आहेत. तर नटराज अधिक शाश्वत अशा काळाचे दर्शन घडवणारा आहे. 'मंदिरपथगामिनी' या म्हेत्रे यांच्या शिल्पातील स्वी ची आकृती क्लासिकल शैलीतील आहे. पण तिचे सौंदर्य केवळ रसिकांच्या आस्वादासाठी नाही. रसिकांची दखलही न घेणारी अंतर्भुख अशी तिची दृष्टी आहे. आजच्या चित्रकलेमध्ये मा दोन्ही प्रवाहांचा संगम झालेला आढळतो. आकार आणि अवकाश, रंगलेपन, पर्स्पॅक्टिव्ह, विरुपीकरण, माध्यम यांच्मा उपयोजनामध्मे हा संगम आढळतो. लोक व्यवहार आणि अभिजात कला यांच्यातील सीमारेषा आज पुसट होत चालल्या आहेत. पण आदिम संस्कृतीतील व्यवहार आणि कला यांची एकरूपता त्यात अपेक्षित नाही. त्याऐवजी विविध संवेदनशीलता मधला ताण आणि विघटनच त्यात बऱ्याच वेळा दिसून मेते.

या सर्व स्थितीचा आढावा घेतल्यास कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर चित्रकला आणि शिल्पकला या क्षेत्रातसुद्धा खूप बदल झालेले दिसून आले आहेत. कोरोना महामारीनंतर चित्रकला व शिल्पकला या दृकमाध्यमातील कलांच्या अर्थजगत, संस्कृती, समाज आणि कलाकार यांच्मावर खूप मोठा परिणाम झालेला दिसून मेतो.

कोव्हिड १९ मुळे जगभरातील माणूस भयाने हादरून गेला. माणसाच्या, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक व्यवस्था कोरोनामुळे कमालीच्या असुरक्षित झाल्या आहेत. तसेच व्यापार क्षेत्र, उद्योग आणि मनोरंजन क्षेत्र ढासळली आहेत. शिक्षण क्षेत्रावर कोरोनाचा खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो. तरीसुद्धा या सर्व परिस्थितीला तोंड देण्याचे काम माणूस करत आहे. भारतात कोरोना महामारीच्या या प्रसाराला रोखण्यासाठी जवळजवळ पाच टप्प्यामध्ये लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला गेला.

त्यामुळे कोरोनाची झळ जशी वेगवेगळ्या क्षेत्रांना बसली आहे. तशीच ती दृश्यकला क्षेत्रालाही बसलेली दिसून येते. चित्र आणि शिल्प या कला क्षेत्रांचा प्रभाव खूप कमी समुदामावर आहे. चित्र आणि शिल्प या दुककला प्रकारांना यापूर्वीच २००५ ची आर्थिक मंदी आणि त्यानंतर २०१६ ची नोटाबंदी यामुळे खूप मोठा परिणाम झालेला दिसून मेतो. त्यामुळे दृश्यकला क्षेत्रातील आर्थिक व्यवहार बऱ्याच प्रमाणात मंदावले आहेत.

२० मार्च २०२० पासून देशातील कलादालने, वस्तुसंग्रहालये, कला महाविद्यालये कोरनामुळे बंद होती. कोरोना संकट कमी झाले असले तरी ती उघडली तरी प्रदर्शने होण्याची शक्यता कमीच आहे. चित्र प्रदर्शने आणि गॅलरीमध्ये कलारसिक येतील का? असा प्रश्न पडतो आहे. तसेच आर्ट चे चाहते, बायर, क्युरेटर हेही या काळात गॅलऱ्यांकडे फिरकले नाहीत. त्यामुळे काही काळासाठी कला प्रदर्शने ही कलाकारासाठी मोठी जोखीम असेल. या सर्व परिस्थितीमध्ये कलादालनाचा कल हा कलाप्रदर्शने करण्याकडे राहील. कारण आगाऊ पैसे घेऊन त्यांनी जवळपास वर्षभराचे अगोदरचे बुकिंग केलेले असते. त्यामुळे प्रदर्शनी नाही झाले तरी गॅलरी मालकांना त्याचा फारसा फरक पडणार नाही. मात्र जे कलावंत केवळ चित्र आणि प्रदर्शनावर अवलंबून आहेत, त्मांच्मावर मा परिस्थितीचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

दृश्यकला क्षेत्राला १९९५ ते २००८ या कालखंडात प्रबंड भरभराट होती. या काळात कलाकृतींची विक्री बऱ्यापैकी होत होती व किंमतही चांगली मिळत होती. याच दशकात प्रसिद्ध चित्रकार एम.एफ. हुसेन यांची चित्रे सर्वत्र चर्चेचा विषम ठरली. त्यांच्या कलाकृती लाखो किमतीला विकल्या जाऊ लागल्या. चित्रकलेला चांगले दिवस यायला सुरुवात झाली. पण २००८ च्या आर्थिक मंदीत ती ओसरली गेली. चित्र प्रदर्शन करण्यासाठी कलाकाराला खूप खर्च येत असतो. त्याला आधी तीन–चार वर्षे खपावे लागते. रंग साहित्य, फ्रेमिंग, प्रसिद्धी वाहतूक अशा अनेक अडचणीतून त्याला जावे लागते. हे सर्व करताना कलाकाराला वेळ, श्रम, पैसा लावावा लागतो. कलाकृतींचा विषम, आशम आणि अविष्कार हा एक वेगळाच विषम असतो. या सर्व प्रक्रियेत कलाकारांच्या कुटुंबालाही त्रास होत असतो. इतके करूनही चित्रांची विक्री झाली नाही तर, कलाकारांच्या अंगावर ही मेहनत व खर्च पडतो. त्यामुळे आर्थिक परतफेडीच्या ताणतणावातच तो कलाकार प्रवाहाबाहेर फेकला जातो.

कोविड १९ च्या प्रादुर्भाव व त्याचा परिणाम हा उद्योग व्यवसायांवर दूरगामी झालेला आहे. बाजारपेठेतील आर्थिक उलाढालीचा दर कमी झालेला आहे. अशा या आर्थिक परिस्थिती कला ग्राहक चित्रकृतीत पैसे गुंतवेल असे

वाटत नाही. त्यामुळे नवोदित कलाकारांना याचा फटका बसणार. देशांमध्ये कलाकृतीच्या विक्रीसाठी केंद्रबिंदू असणाऱ्या आर्ट गॅलरा मुख्यतः मुंबई, दिल्ली, चेन्नई, बेंगलोर अशा शहरात आहेत आणि नेमक्या याच शहरांमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव जास्त होतो. त्यामुळे दृश्यकला क्षेत्रावर याचा दुरगामी परिणाम होणार असेच म्हणावे लागते.

**प्रमुख निष्कर्ष :–**

१) राष्ट्रीय स्तरांवर कोरोना महामारीचा दृश्यकलेवर मोठा परिणाम झालेला दिसून मेतो.

२) राष्ट्रीय स्तरावर चित्र शिल्प आर्थिक व्यवहारांमध्ये ३५ टक्के घट झालेली आहे.

३) दृश्य कलेतील आर्थिक बाजारपेठेवर कोरोना महामारीचा परिणाम झालेला दिसून मेतो.

४) भारतातील आर्ट गॅलरीच्या उत्पन्नात घट झालेली दिसून मेते.

५) दृश्यकला क्षेत्रामध्ये चित्रकाराच्या आर्थिक जीवनावर मोठा परिणाम झालेला आहे.

**संदर्भसूची**

१) भारतीय कलेचा इतिहास संध्या केतकर, ज्योत्स्ना प्रकाशन, २०१५. ISBN-978-81-7925-428-8

२) कॅनव्हास, अच्युत गोडबोले आणि दिपा देशमुख मनोविकास प्रकाशन, २०१५ ISBN-978-93-8385-0096-9

३) सीसीआरटी सेंटर ऑफ कल्चरल रिसोर्स अँड ट्रेनिंग दिल्ली वेबसाइट - www.ccrtiudia.gov.in

४) लोकराज्य मासिक २०११ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन,

५) मैफल रंगाची लेख मालिका दै. महाराष्ट्र टाईम्स

६) मराठी नियतकालिकातील दृश्य कला विचार रमेशचंद्र पाटकर ज्योत्स्ना प्रकाशन, २००९ ISBN-978-81-7925-120-9